**शिवाजी आण्णा देवकते वगैरे वि.**

**संतोष सुभाष पवार वगैरे.**

**आदेश निशाणी क्रमांक १९ वर**

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी क्र. १ व २ यांनी प्रतिदाव्यास कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत स्वीकारण्याची विनंती केलेली आहे.

२. वादीच्या मते, या मुळ दाव्यामध्येच प्रतिवादी यांनी प्रतिदावा दिनांक १०.०२.२०२३ रोजी दाखल केला असून त्याची प्रत प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी २९.०२.२०२३ रोजी स्वीकारली आहे. तसेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी हे शेतकरी आहेत. त्यातील एक प्रतिवादी ही महिला आहे. तसेच, शेतीच्या कामातून आवश्यक ती माहिती व कागदपत्र उपलब्ध न झाल्याने कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. तसेच, प्रतिवादीविरूध्द विना म्हणणे व कैफियतीचा आदेश अदयापपर्यंत मे. कोर्टाने केलेला नाही. तरी सदर कामात वादी क्र. १ व २ यांना सुमारे ३७ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादीने सदरचा विलंब जाणूनबुजून केलेला नाही. त्यामुळे वादी यांचे नैसर्गिक न्याय व हक्काच्या अधिकारासाठी न्यायालयाने सदर वादीच्या हक्काचा विचार करुन कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत स्वीकारण्यात यावी अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिदाव्यातील वादींनी आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, सदरचा विलंब माफीचा अर्ज व बरोबर असून तो त्यांना मान्य व कबूल नाही. विलंबाचे कारण अप्रामाणिक आहे. यदाकदाचित अर्ज मंजुर करायचे झाल्यास रक्कम रूपये २०००/– इतका खर्च आकरण्यात यावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी दिनांक १०.०२.२०२३ रोजी प्रतिदावा केला असून त्याच्या प्रती मुळ वादी यांनी दिनांक २९.०२.२०२३ रोजी स्वीकारलेल्या आहेत. वादीने अर्जात दिलेल्या कारणास्तव कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. तसेच विलंबाचे कारण देखील

संयुक्तीक दिसून येत नाही. वादीने सदर विलंबाबाबत योग्य स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच दाव्याचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता वादीची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदरची कथनांच्या पुष्ठर्थ त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. ते निशाणी क्र. २० ला आहे. त्यामुळे वादीस संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. वादींची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास मुळ प्रतिवादींना प्रस्तुतच्या दाव्याकामी कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु. २००/– खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी क्र. १ व २ यांनी खर्चाची रक्कम मुळ प्रतिवादी यांना पुढील तारखेस किंवा त्याआधी देण्याची आहे. त्यानंतर वादीची कैफियत व म्हणणे अभिलेखावर नोंदवले जाईल.

३. वादी यांनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम देण्यास कसूर केलेस प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द करणेत येईल.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

SONAL ANANDRAO SALUNKHE

Digitally signed by SONAL ANANDRAO SALUNKHE
Date: 2023.06.17 15:32:19 +0530

दिनांक– १६/०६/२०२३ श्रीमती एस. ए. साळुंखे

ठिकाण– पंढरपूर प्रभारी ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi ( L. G.) |
| Court | :- | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 16.06.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 17.06.2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 17.06.2023 |